# महाराष्ट्र शासन
# वनविभाग
# मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे

-----------------------------------

## वनरक्षक भरती प्रक्रिया २०१८

## उमेदवारांकरीता सूचना

ठाणे वनवृत्तातील वनरक्षक संवर्गातील अनुसूचित क्षेत्र (ठाणे व पालघर जिल्हा) व बिगर अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पद भरतीप्रक्रियेअंतर्गत धावण्याच्या चाळणी चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची शारीरिक मोजमाप तपासणी दि. २८/११/२०१६ ते दि. ०३/१२/२०१६ या कालावधीत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे यांचे कार्यालयाचे आवारात घेण्यात आलेली आहे. सदर शारीरिक मोजमाप तपासणीबाबतचा निकाल सोबत प्रसिध्द करणेत येत आहे.

ज्या मागासवर्गीय उमेदवारांना शारीरिक मोजमाप तपासणीमध्ये सवलत देऊन पात्र ठरलेले आहेत अशा उमेदवारांचा बिगर अनुसूचित क्षेत्रातील खुल्या प्रवर्गातील पदांकरीता विचार केला जाणार नाही याबाबतची नोंद संबंधित मागासवर्गीय उमेदवारांनी घ्यावी.

सरळसेवा भरतीप्रक्रियेसंबंधी शासनाकडून प्राप्त झालेल्या शासन निर्णयानुसार भरती प्रक्रियेतील पुढील टप्प्यातंर्गत धावण्याच्या स्पर्धात्मक चाळणी चाचणी व शारिरीक मोजमाप तपासणी अंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची १:३ या प्रमाणात लघुयादी तयार करणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. लघुयादी स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल.

त्यानुसार वनरक्षक भरती प्रकियेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या पुढील टप्प्यांवरील कार्यक्रमाबाबतच्या सविस्तर सूचना वेळोवेळी मे.महाऑनलाईन लिमिटेड या संस्थेच्या http://maharecruitment.mahaonline.gov.in व वनविभागाच्या http://mahaforest.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल याबाबतची नोंद कृपया सर्व उमेदवारांनी घ्यावी.

ठिकाण :- ठाणे

दिनांक :- २२/१२/२०१६

अध्यक्ष,
प्रादेशिक निवड समिती
तथा
मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
ठाणे वनवृत्त, ठाणे